# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नांदेड जिल्ह्यातील जाती वैधता प्रमाणपत्राचे प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असल्याबाबत

**(१) १००७४ (०९-०४-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नांदेड जिल्ह्यातील देगलूर, बिलोली व मुखेड या तालुक्यातील मन्नेरवारलू व कोळी महादेव या जांतीच्या वैधता प्रमाणपत्राचे प्रस्ताव जात पडताळणी समिती औरंगाबाद यांच्याकडे प्रलंबित असून, या जमातीच्या व्यक्तीवर अन्याय होत असल्याची तक्रार लोकप्रतिनिधी मा.मुख्यमंत्री व आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर काय कारवाई करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२४-१०-२०१६) :** (१) होय.

(२) अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज अर्धन्यायिक स्वरूपाचे असून अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) नियम, २००३ मधील तरतुदीनुसार समिती जात वैधततेबाबत तपासणीअंती गुणावगुणानुसार निर्णय घेते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरगांबाद विभागातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे निकाली काढण्यात आलेल्या अनूसूचित जमाती दाव्याची पुन्हा तपासणी करण्याबाबत**

**(२) ११४२४ (०९-०४-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरगांबाद विभागातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे तत्कालीन सह आयुक्त श्री व.सू.पाटील यांच्या कार्यकाळात निकाली काढण्यात आलेल्या अनूसूचित जमाती दाव्याची विद्यमान आयुक्तांकडून पुन्हा तपासणी करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च न्यायालय, औरंगाबाद यांची त्याकरिता परवानगी घेणे आवश्यक असताना तशी परवानगी न घेता विशिष्ट हेतूने प्रेरित होऊन पुन्हा दाव्याची तपासणी करण्याचा घाट घातला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढ्ळून आले आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२७-१०-२०१६) :** (१), (२) व (३) श्री. व.सु. पाटील तत्कालीन सह आयुक्त अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरगांबाद यांच्या दिनांक ६/९/२०१० ते दिनांक ५/१०/२०११ या कार्य कालावधीतील निर्गमित केलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांच्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्यासाठी मा. उच्च न्यायालयामध्ये विशेष याचिमा दाखल करण्याची कार्यवाही करण्याबाबत आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना दिनांक २७/६/२०१६ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील माथाडी कामगारांच्या कायद्यात बदल होणार असल्याबाबत**

**(३) १६६९६ (०६-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मॉलच्या रुपात कामगारांचा रोजगार हिसकावून घेण्याचा प्रयत्न होत असून राज्यात शासनाचे उद्योगमंत्री यांनी माथाडी कामगारांच्या कायद्यातुन औद्योगिक क्षेत्र वगळण्याची घोषणा करीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील माथाडी कामगारांनी संघर्ष करुन माथाडी कामगार कायदा करुन घेतला परंतू नवीन शासन या कायद्यात बदल करणार असल्याने माथाडी कामगारांवर अन्याय होणार आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासी लोकांना जातीचे प्रमाणपत्र व इतर लाभ देण्याबाबत

**(४) २१०७५ (०६-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील जळगांव जामोद व संग्रामपुर तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगांमध्ये धनके, भिलाला, बारेला, पावरा या आदिवासी समाजाचे वास्तव्य आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदिवासी समाजाचा समावेश अनुसूचित जमातीच्या शासन विहीत सुचीमध्ये आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास सदर आदिवासी किती वर्षापासून या परिसरात वास्तव्यास आहेत, तसेच त्यांना जातीचे प्रमाणपत्र व इतर लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२४-१०-२०१६) :** (१) जळगाव जामोद व संग्रामपूर तालुक्यांमध्ये भिलाला व पावरा जमातीचे वास्तव असून धनके आणि बारेला या जमातीबाबत निश्चित माहिती सद्यस्थितीत उपलब्ध नाही.
(२) केंद्र शासनाच्या अनुसूचित जाती जमाती आदेश(संशेधन) अधिनियम, १९७६ अंतर्गत महाराष्ट्र राज्य आदिवासी जमातींच्या यादीमध्ये अ.क्र. ८ वर भिलाला आणि पावरा तसे अ.क्र. १३ वर धनका जमात नमूद आहे.
(३) भिलाल आणि पावरा या जमाती मध्य प्रदेश राज्यातून टप्याटप्याने गेल्या सुमारे २५-३० वर्षापुर्वी महाराष्ट्र राज्याच्या हद्दीत स्थलांतरीत झाल्या आहेत. महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) नियम, २००३ मधील नियमांनुसार दिनांक ६/९/१९५० पुर्वीच्या जमातीचा महाराष्ट्र राज्यातील पुरावा सादर करणा-या अर्जदारास प्रमाणपत्र देण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सहकार क्षेत्रात ३.०० लक्ष रुपयांच्या वरील खरेदी ऑनलाईन टेंडरद्वारे करणेबाबत**

**(५) २८४८६ (२२-१२-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या ०६.०६.२०१४ च्या शासन निर्णयाने सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिनस्थ महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी ३.०० लक्ष रुपयांवरील खरेदीसाठी ऑनलाईन टेंडर करणे बंधनकारक केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयातून सहकारी संस्थांना ऑनलाईन टेंडर प्रकियेतून सुट देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी संस्थांमध्ये खरेदीच्या माध्यमातून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होत असल्याची बाब विविध चौकश्यांमधून पुढे आलेली असतांनाही सहकारी संस्थांना ऑनलाईन टेंडर प्रकियेतून सुट देण्याची कोणती कारणे आहेत,

(४) असल्यास ,सहकारी संस्थांना ऑनलाईन टेंडर प्रकिया लागू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. सुभाष देशमुख (१७-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

दि. २६/११/२०१४ रोजी सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णय सर्व मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिनस्त कार्यालये, महामंडळे, मंडळे यांना लागू आहे.

(२) ई टेंडरीग प्रक्रिया सहकारी संस्थांना बंधनकारक केलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणा-या परिपोषण अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(६) ४२०३७ (१२-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारे परिपोषण अनुदान हे अपुरे असून ४ थ्या वेतन आयोगाच्या शिफ़ारशीनुसार दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या अनुदानात वाढ करण्याविषयी कोणती उपाययोजना केली आहे वा करीत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०८-२०१६) :**(१) व (२) मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखालील अभ्यासगटाने केलेल्या शिफारशीनुसार शासनाने परिपोषण अनुदानाचा दर निश्चित केला आहे. वाढती महागाई विचारात घेऊन परिरक्षण अनुदानात वाढ करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि.१ मार्च, २०१६ नुसार अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर, वेल्हे व मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सभासदांना पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज शक्ती मर्यादा वाढवून देणेबाबत**

**(७) ४२४६९ (२७-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर, वेल्हे व मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांना महाराष्ट्र सरकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४३ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३५ अन्वये तालुक्यातील सर्व वि.का. सेवा सोसायटीचे सभासदांना पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज शक्ती मर्यादा वाढवून देणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे यांचेकडे सन २०१५-१६ मध्ये भोर तालुक्यातील ३६ व वेल्हे तालुक्यातील ४ प्रस्ताव प्राप्त झाले होते. प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावातील संस्थांना कर्ज उभारणी मर्यादा वाढवून देण्यात आली आहे. तसेच मुळशी तालुक्यातील एकही प्रस्ताव प्राप्त न झाल्याने कर्ज उभारणी मर्यादा वाढवून देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात दलित सुधार योजनेचे प्रस्ताव मान्यते अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(८) ४३३३८ (२८-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दलितवस्ती सुधार योजनेचे सुमारे ३५ कोटी रुपयांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाना मान्यता देवून दलितवस्ती सुधार योजनेची कामे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०१-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) रुपये ९,५६,००,०००/- व २६,२५,४२,८९०/- या रकमांची एमटीआर-४४ ची देयके कोषागार कार्यालयात सादर केली असता कोषागार अधिकारी, नाशिक यांचेकडून सदर देयकांस अनौपचारीक प्रत नसल्याबाबतची त्रुटी नमूद करुन देयके जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक कार्यालयास परत करण्यात आले होते. तद्नंतर सदर अनैपचारीक संदर्भाची प्रत माहे जानेवारी, २०१६ मध्ये प्राप्त झाल्यानंतर सदर अनौपचारीक संदर्भाची प्रत सदर देयकांस जोडून सदर त्रुटीची पुर्तता झाल्यामुळे सदर देयके कोषागार कार्यालयात सादर केली, कोषागार कार्यालयाने उक्त रकमाची देयके दिनांक अनुक्रमे १३ व २१ जानेवारी, २०१६ रोजी पारित करुन धनादेश वितरीत केलेले आहेत. त्यानंतर माहे फेब्रुवारी व मार्च, २०१६ मध्ये प्रस्तावाना प्रशासकीय मान्यता देऊन ९०% अनुदान गट स्तरावर वित्त प्रेषणाद्वारे वितरीत करण्यात आले आहे.

---

### शेती व पिकांसाठी दागिने गहाण ठेऊन ३ टक्के व्याज दराने कर्ज देण्याच्या राष्ट्रीयकृत बँकांच्या योजनेला केंद्र शासनाने पुर्नपत पुरवठा करण्यास नकार दिल्याबाबत

**(९) ४३४५७ (२७-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेती व पिकांसाठी दागिने गहाण ठेऊन ३ टक्के व्याज दराने कर्ज देण्याच्या राष्ट्रीयकृत बँकांच्या योजनेला केंद्र शासनाने पुर्नपत पुरवठा करण्यास माहे डिसेंबर २०१५ च्या पहिल्या आठवड्यात नकार दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्याला या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ९०० कोटीचा पतपुरवठा झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्राच्या निर्णयामुळे ३ ऐवजी ९.५५ टक्के व्याज शेतकऱ्यांना आकारले जाणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी सोने तारण योजना सुरू करण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-१०-२०१६) :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र बँकेने दागिने गहाण ठेवून कृषि कर्ज या योजनेअंतर्गत दि.३१.३.२०१६ पर्यंत रु.३८४ कोटी रकमेचा पतपुरवठा महाराष्ट्र राज्यात केला आहे.

(३) नाही.

(४) अशी योजना शासन स्तरावर विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचा कर्ज पुरवठा बंद केल्याबाबत**

**(१०) ४४४०८ (२८-०४-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गेल्या वर्षभरापासून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचा कर्ज पुरवठा बंद केल्यामुळे अनुदान योजने अंतर्गत मंजुर झालेले २६७१ व बीजभांडवल योजने अंतर्गत ११५३ लाभार्थींचे प्रस्ताव महामंडळ व बँकांकडून मान्यता मिळूनही शासनाच्या निर्णयामुळे सदर लाभार्थी कर्ज व बीजभांडवलापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाभार्थ्यांचे अनुदान योजनेतील ३ कोटी ८२ लाख ४० हजार, तर बीजभांडवल योजनेतील १२ कोटी ५१ लाख ४२ हजार इतके रुपये हे आर्थिक वर्ष सुरु होऊन ९ ते १० महिने होऊनही शासनाच्या निर्णयामुळे अडकून पडले असून, त्याचें वितरण लाभार्थींना करण्यात न आल्याने त्यांना कर्ज पुरवठा करण्यात येत नसल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, अनुदान व बीजभांडवल योजने अंतर्गत राज्यातील २५ ते ३० जिल्यातील लाभार्थी कर्ज व बिल भांडवल योजने अंतर्गत पात्र असूनही, त्यांना मंजूर रक्कम न देण्याची सर्वसाधाण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, पात्र लाभार्थींना सदर रकम मिळण्याकरिता शासन कोणती उपायोजना करणार आहे ? नसल्यास विलंबाची कारणे नाही ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१६) :** (१) नाही.
(२), (३) व (४) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या कर्ज योजनांमध्ये कर्ज मंजूरी व वितरणास दि.०२.१२.२०१४ च्या शासन आदेशान्वये स्थगिती देण्यात आली होती. दि.०१.०३.२०१६ रोजी महामंडळाच्या अनुदान योजना व बिज भांडवल कर्ज योजना या योजनांतर्गत कर्ज वितरण करण्याबाबतची स्थगिती उठविण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हानिहाय प्रलंबित प्रकरणांतील अनुदान योजनेमधील ३०५१ लाभार्थीकरिता रु.४२७.०० लाख व बीजभांडवल योजनेमधील ११४२ लाभार्थीकरिता रु.१३७८.५० लाख निधी महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयामार्फत जिल्हा कार्यालयांना वितरीत करण्यात आला आहे.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील सन २०१२-१३ या वर्षातील शेतकऱ्यांना मिळावयाच्या चार टक्के व्याज परताव्याच्या याद्या कागल सहायक निबंधक कार्यालयातून गहाळ झाल्याबाबत**

**(११) ४५३१७ (२७-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील सन २०१२-१३ या वर्षातील शेतकऱ्यांना मिळावयाच्या चार टक्के व्याज परताव्याच्या याद्या कागल सहायक निबंधक कार्यालयातून गहाळ झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-१०-२०१६) :**(१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या मायक्रो फायनान्स योजनेत सफाई कर्मचा-यांना कर्जाचे वाटप झालेले नसल्याबाबत**

**(१२) ४५७८३ (२८-०४-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या मायक्रो फायनान्स योजनेत सफाई कर्मचा-यांना मंजूर झालेल्या कर्जाचे वाटप एक वर्षानंतरही झालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिल्लीतील (एनएसकेएफडीसी) सफाई कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटूंबियाचे पुनर्वसन करण्याकरीता अर्थसहाय्य देण्यात येते यात मायक्रो एमएसवाय-एमसीएफ योजनेंतर्गत कर्ज पुरवठ्यांसाठी जिल्ह्यातील सफाई कामगारांकडून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने अर्ज मागविले हाते लाभार्थ्यांनी माहे जून, २०१३ मध्ये संबंधित कार्यालयाकडे अर्ज सादर केले व त्यानंतर लकी ड्रा काढण्यात आले परतु सर्व प्रक्रिया करुन २० पैकी एकाही लाभार्थ्यांला अद्यापही कर्ज मिळाले नाही तरी याबाबत शासन चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०८-२०१६) :** (१) नाही, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या अधिनस्त औरंगाबाद जिल्हा कार्यालयाकडे मायक्रो फायनान्स (एमसीएफ) योजनेअंतर्गत एकूण १५४५ कर्ज प्रकरणांची व एमएसवाय योजनेअंतर्गत एकूण १८१३ कर्ज प्रकरणाची यादी प्राप्त झालेली होती. मात्र, सन २०१३-१४ मध्ये एमसीएफ या योजनेअंतर्गत एकूण ५४६ इतक्या कर्ज प्रकरणांचा निधी शिल्लक असल्याने व एमएसवाय या योजनेअंतर्गत २६२ कर्ज प्रकरणांचा निधी शिल्लक असल्याने, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली ईश्वरचिठ्ठीनुसार सदर कर्ज वितरणाची कार्यवाही माहे नोव्हेंबर, २०१४ ते जानेवारी, २०१५ मध्ये करण्यात आलेली आहे.

(२) एमसीएफ योजनेंतर्गत ५४६ व एमएसवाय या योजनेअंतर्गत २६२ प्रकरणांत ईश्वर चिठ्ठीनुसार कर्ज वाटप केल्यानंतर एमसीएफ योजनेअंतर्गत एकूण ९९९ कर्ज प्रकरणे व एमएसवाय योजनेअंतर्गत एकूण १५५१ कर्ज प्रकरणे ही निधीअभावी वितरणाकरीता प्रलंबित आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रानेगावं (ता. तेल्हारा, जि. अकोला) येथे माहे संप्टेबर २०१५ मध्ये दलितांवर अत्याचार व घराची नासधुस केल्याबाबत

**(१३) ४६८३७ (२८-०४-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रानेगांव (ता. तेल्हारा, जि. अकोला) येथील माहे सप्टेंबर, २०१५ ला दलितांच्या घरांची नासधुस करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमुर्ती सी.एल. थुल, यांनी सदर गावास दिनांक १३ जानेवारी, २०१६ ला भेट दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, दलितांवर अत्याचार व घरांची नासधुस करणाऱ्यांवर पोलीस विभागाने कारवाई केली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (२५-१०-२०१६) :** (१) होय.

(२) होय,

(३) होय,

(४) दलितांवर अत्याचार व घरांची नासधुस करणारे आरोपी (१) सोपान प्रल्हाद कुकडे (२) निवृत्ती उर्फ कचरू सोपान कुकडे (३) प्रदीप श्रीधर कुकडे जात कुणबी रा. राणेगाव याचेंविरूध्द दिनांक २९/१२/२०१५ रोजी पोलीस स्टेशन तेल्हारा येथे अप क्र. ३१३५/२०१५ कलम ३(१)(१०)(१५) अ.जा.ज.अ.प्र. कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपी यांना अटक करून अटक आरोपी क्र ०३ यांचेविरूध्द शु.न. ०१/१६, कलम ११० (ई)(ग) जाफौ नुसार व आरोपी क्र. १ व २ यांचेविरूध्द शु.न. १०/१६ कलम १०७,११६(३) ज जाफौ नुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच अप क्र. ३१३५/२०१५ कलम ३(१)(१०)(१५) अ.जा.ज.अ.प्र. कायद्याचे तपासादरम्यान नमुद आरोपींना फिर्यादी व बौध्द समाजाच्या लोकांची घरे पाडून १६,००,०००/-रू. चे घरातील साहित्याची चोरी करून २,००,०००/-रू. चे असे एकूण अंदाचे १८,००,०००/-रू नुकसान केल्याचे निष्पन झाल्यावरून दिनांक ०८/०१/२०१६ रोजी सदर गुन्हयात सहकलम ३४१,४२७,४५४,४५७,३८०,५०६,३४ भांदवि चे समाविष्ट करून संबंधितांना कळविण्यात आले. तसेच आरोपीविरूध्द सबळ पुरावा उपलब्ध झाल्याने त्यांचेविरूध्द विशेष न्यायालयात दोषारोप पत्र क्र.८७/१५ दिनांक ११/१२/२०१५ व कोर्ट केस क्र १४८/१५ दिनांक ११/१२/२०१५ प्रमाणे न्यायप्रविष्ठ करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निलकमल पार्टीकल बोर्ड, पारोळा जि.जळगांव संस्थेत शेतकऱ्यांकडून लाखो रुपयांचे शेअर्स गोळा करुनही कुठलीही प्रगती झालेली नसल्याबाबत**

**(१४) ४७५०८ (२७-०४-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निलकमल पार्टीकल बोर्ड, पारोळा जि.जळगांव या नावाने नोंदणी झोलेली संस्था व त्याच नावाने शेतकऱ्यांकडून लाखो रुपयांचे शेअर्स गोळा करुनही कुठलीही प्रगती झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या २० वर्षात एकदाही मासिक बैठक व वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आलेल्या नाहीत याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी तक्रार करुनही सहकार विभागाकडून कोणतीही चौकशी केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या बोर्डावर संचालक मंडळ बरखास्त करुन त्यावर प्रशासक बसविण्याची कार्यवाही शासनस्तरावर होणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

निलकमल स्टॅकप्लॉय सहकारी संस्था मर्या. पारोळा ता.पारोळा जि.जळगांव ही संस्था सहकारी कायद्यान्वये दि. १२.३.१९९१ रोजी नोंदणी झालेली संस्था आहे. सदर संस्थेच्या नावात बदल झाला असून सदर संस्थचे नविन नाव निलकमल मल्टीकॉन को.ऑप सरकारी संस्था मर्या. परोळा असे आहे. संस्थेचे २४९१ शेतकरी व संस्था सभासद असून संस्थेने वसूल भागभांडवल सभासदांकडून शेअर्स फी व ईतर फी अशी एकूण रु. २८,३३,०००/- गोळा केलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

संस्थेच्या उपलब्ध असलेल्या लेखापरिक्षण अहवालानुसार व संस्थेने सन २००३ ते २००८ या कालावधीत वार्षिक साधारण सभा व संचालक मंडळाची सभा व संचालक मंडळाची सभा घेतलेली नाही. याबाबत लोकप्रतिनिधींनी कोणतीही तक्रार केलेली नाही. सन २००८ ते २०१६

या कालावधीत संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभा व संचालक मंडळाच्या सभा घेतलेल्या असल्याचे संस्थेचे लेखापरिक्षण अहवाल व संस्थेच्या दप्तरावरुन दिसून येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागु नाही.

---

**शासकीय वसतीगृहातील स्वयंपाकी/मदतनीस चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना सार्वजनिक व साप्ताहिक सुट्या मंजूर करण्याच्या मागणीबाबत**

**(१५) ४७५३७ (२८-०४-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समाज कल्याण विभागांतर्गत शासकीय वसतीगृहातील स्वयंपाकी/मदतनीस चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना सार्वजनिक व साप्ताहिक सुट्या मंजूर करण्याच्या मागणीबाबत दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनास विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-१०-२०१६) :**(१) होय, सदर विषयाबाबत निवेदन शासनास दि.१७ डिसेंबर, २०१५ रोजी प्राप्त झालेले आहे.
(२) सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतीगृहांतील स्वयंपाकी/मदतनीस चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना सार्वजनिक व साप्ताहिक सुट्या मंजूर करण्याच्या मागणीबाबत सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असून सदर अहवालांच्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील संजय गांधी निराधार योजना विधवा महिला जिवंत असेपर्यंत सुरु ठेवण्याबाबत**

**(१६) ४८०५७ (२८-०४-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजनेत मुलांना १८ वर्ष होईपर्यंत सदर योजनेचा लाभ देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विधवा महिलांची पेन्शन बंद करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मुलांनी आपल्या आईचे पालनपोषण न केल्यास विधवा महिलेवर उपासमारीची वेळ येते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पेन्शन विधवा महिला जिवंत असेपर्यंत सुरु ठेवण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०६-०९-२०१६) :**(१) संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत १८ वर्षाखालील अनाथ मुले यांना लाभ दिला जातो.
(२), (३) व (४) संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत निराधार विधवा महिलाबरोबरच विविध रोगांनी ग्रस्त व्यक्ती, अपंगातील विविध प्रवर्ग, तृतीयपंथी, परित्यक्ता, देवदासी, अत्याचारित महिला, वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला, घटस्फोटीत व घटस्फोट प्रक्रियेतील महिला १८ वर्षाखालील अनाथ मुले इ. विविध प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदर प्रवर्गातील लाभार्थ्यांची मुले (मुलगा) २५ वर्षाची होईपर्यंत किंवा त्यांना शासकीय / निमशासकीय / खाजगी नोकरी मिळेपर्यंत यामध्ये जे अगोदर घडेपर्यंत लाभ देण्यात यावा तसेच मुलाला नोकरी मिळाल्यानंतर मुलाचे व कुटूंबाचे उत्पन्न विचारात घेऊन लाभार्थ्यांची पात्रता ठरविण्यात यावी अशी तरतूद आहे. वर नमूद केल्याप्रमाणे विविध प्रवर्गातील लाभार्थ्यांची व्यापक संख्या विचारात घेता फक्त विधवांनाच जीवंत असेपर्यंत सुरु ठेवणे संयुक्तिक होणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील समाजकल्याण मार्फत चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांच्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याबाबत**

**(१७) ४८०६४ (२८-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील समाजकल्याण मार्फत चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक ८२० आश्रमशाळांच्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन मागील दोन महिन्यांपासून देण्यात आले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास उजेडात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकरणाची चौकशीत करण्यात आली काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१३-१०-२०१६) :**(१), (२), (३) व (४) होय, अंशतः खरे आहे.

आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध असल्यास व संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांनी वेळेत देयके सादर केल्यास नियमित वेतन अदा केले जाते. आश्रमशाळांना वेतन अनुदान देण्यात येते व वेतन अनुदान हे निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. त्यामुळे काही प्रसंगी निधी उपलब्ध नसल्यास वेतन करण्यास विलंब होतो.

सन २०१६-१७ मधील मंजूर तरतूदीमधून थकीत वेतन अदा करण्यात आलेले आहे.

---

**संजय गांधी निराधार योजनेतील अपात्र लाभार्थी व गैरव्यवहारांबाबत**

**(१८) ४८१०४ (२८-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थी अपात्र ठरले अथवा योजनेत गैरव्यवहार झाला तर त्याकरिता संबंधित समिती सदस्यांनाच जबाबदार धरले जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील१७ हजारांवर लाभार्थी अपात्र ठरवण्यात आले असून या प्रकरणी संबंधित समिती सदस्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०६-०९-२०१६) :**(१) होय. दि. १३/१०/१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे तसे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) कोल्हापूर जिल्ह्यात दि. १५/१२/२०१४ ते दि. ५/१/२०१५ दरम्यान मोहिम राबविण्यात आली. साधारणतः १४ हजार लाभार्थ्यांना दि. १/८/२०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे बाजू मांडण्याची संधी देऊन अपात्र ठरवण्यात आले आहे.

समिती सदस्यांचा अपात्र ठरविण्याचा शासन निर्णय दि१३.१०.२०१५ रोजी पारित झाला असल्याने सदर शासन दिनांकापासून पुढील बाबीसाठी अमंलबजावणीसाठी अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा बँकेने ६५ संस्थांना अपुऱ्या व विनातारण कर्ज वाटप केल्याबाबत**

**(१९) ४८३११ (२७-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील जिल्हा बँकेने ६५ संस्थांना अपुऱ्या व विनातारण कर्ज वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनातारण कर्ज वाटपप्रकरणी आतापर्यंत किती जणांवर व किती रुपयांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे,
(३) तसेच या कर्ज थकीत संस्थावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, कारवाई केली असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-१०-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.
(२) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ६५ संस्थांना केलेल्या अपुऱ्या व विनातारण कर्ज वाटपाच्या अनुषंगाने म.स.सं.अधि.१९६० चे कलम ८८ अन्वये दि.२३/१/२०१५ रोजीच्या चौकशी अहवालाप्रमाणे बँकेच्या आजी-माजी एकूण ४६ संचालक अधिकारी व कर्मचारी यांचेवर आर्थिक नुकसानीची रु.१४७.०१ कोटी इतक्या रकमेची जबाबदारी निश्चित केलेली आहे.
(३) उपरोक्त कर्ज थकीत संस्थांवर बँकेने सिक्युरिटायझेशन ॲक्ट २००२ अन्वये मा.सहकार न्यायालय, कोल्हापूर येथे वसूलीचे दावे दाखल केले असून सदर प्रकरणी सुनावणी चालू आहे. तसेच बँकेने ओ.टी.एस. स्किम राबविली असून सदर स्किममध्ये ११ संस्थांनी भाग घेऊन त्यांनी २५% प्रमाणे रु.५२१.५३ लाख इतकी रक्कम भरणा केली असून उर्वरित ७५% रक्कम मार्च, २०१७ पर्यंत भरणेचा करार केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील बीज भांडवल योजनेतील अपंग**
**लाभार्थी अनुदानापासून वंचीत असल्याबाबत**

**(२०) ४८४४० (२८-०४-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील बीज भांडवल योजनेतील अपंग लाभार्थ्यांचे प्रस्ताव निधीच्या कमतरतेमुळे सन २०१४ पासून प्रलंबीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील अपंग व्यक्तीशी विवाह केल्यास शासनाकडून मिळाणाऱ्या ५० हजार रुपये अनुदानापासून जिल्ह्यातील २२ अपंग विवाहीत जोडपे सन २०१४ पासून वंचीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जिल्हातील अपंग लाभार्थ्यांना त्वरीत अनुदान उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०६-०९-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.

सन २०१४-१५ मध्ये प्राप्त झालेल्या एकूण २२३ प्रस्तावापैकी ८३ प्रस्तांवांना बँकेने मंजूरी दिली. प्रस्तुत योजनेअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये एकूण रु.१०.२० लाख तरतुद प्राप्त झाली होती. सदर तरतुदीमधून ३३ प्रस्ताव निकाली काढण्यात आले. तसेच सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेल्या रु.३९.८५ लक्ष निधीमधून उर्वरित सर्व प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्यात आलेले आहेत.

(२) होय, हे अशंत: खरे आहे.

अपंग-अव्यंग विवाहित जोडप्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याची नवीन योजना दि. १७ जून, २०१४ च्या शासन निर्णयान्वयचे सुरु करण्यात आली. सदर नवीन योजनेस स्वतंत्र लेखाशिर्ष प्रापत करुन घेणे व तद्नंतर त्या अंतर्गत निधी प्राप्त करुन घेणे याबाबतची कार्यवाही सुरु असल्यामुळे सन २०१४-१५ मध्ये एकूण १६ प्रस्ताव तसेच २०१५-१६ मध्ये एकूण १५ प्रस्ताव असे एकूण ३१ प्रस्ताव प्रलंबित होते.

सन २०१५-१६ मध्ये रु. १.५० लाख तरतुद उपलब्ध झाल्यामुळे एकूण ०३ प्रस्ताव निकाली काढण्यात आले. तसेच माहे डिसेंबर, २०१५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये सदर योजनेसाठी पुरवणी मागणीद्वारे रु. ३५५.५० लक्ष इतकी तरतुद मंजूर करण्यात येऊन जालना जिल्हयासाठी सन २०१६-१७ करीता रु. १५ लाख इतकी तरतुद वितरीत करण्यात आलेली असून, उर्वरित सर्व प्रस्ताव निकाली काढण्यात येत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाबार्डने (राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक) सादर केलेल्या पत आराखड्याबाबत**

**(२१) ४८८२६ (२७-०४-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी क्षेत्रात कर्ज वाटप आणि वसूलीबरोबरच भांडवलनिर्मिती ही महत्वाची असल्यामुळे नाबार्डने (राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक) सादर केलला पत आराखडा त्यादृष्टीने पूर्तता करणारा नसल्यामुळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारा आणि गुंतवणूक कर्जासाठी तरतूद असलेला सुधारीत आराखडा सादर करावा असे आदेश मा. मुख्यमंत्री यांनी दि. २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या दरम्यान मुंबईतील सहयाद्री अतिथीगृहात आयोजित करण्यात आलेल्या “क्रेडिट सेमिनार २०१६-१७” या कार्यक्रमाच्या वेळी नाबार्डला दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असलेल्या नाबार्डने सादर केलेल्या पत आराखड्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यात कोणत्या उणीवा असल्याचे आढळून आलेले आहे,

(३) याबाबत नाबार्डकडून पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-१०-२०१६)** :(१) नाही.
(२) नाबार्डने तयार केलेल्या राज्य पत धोरणामध्ये कोणतीही त्रुटी आढळून आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती औद्योगिक क्षेत्रातील open space ची परस्पर विक्री केल्याबाबत**

**(२२) ४९०५२ (२७-०४-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती औद्योगिक क्षेत्रातील राखीव open space मध्ये भुखंड पाडून परस्पर विक्री केल्याची बाब माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, या चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही. तथापि औद्योगिक क्षेत्रात १० टक्के मोकळी जागा व ५ टक्के सुविधा क्षेत्र राखीव ठेवण्यात येत असून उद्योजकांनी मागणी केल्यानंतर जागा वाटपास शिल्लक नसल्यास मोकळ्या जागेचे या टक्केवारीवरील अतिरिक्त क्षेत्र Minor Modification Committee च्या मान्यतेने औद्योगिक भूखंडात रुपांतर करुन उद्योजकांना महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार वाटप करण्यात येते.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सततची दुष्काळी परिस्थिती व आर्थिक अडचण यामुळे शेतकऱ्यांचा पिककर्ज घेणे व पिकांचा विमा उतरविणे याकडे कल वाढलेला असतानासुद्धा नागरी बँकांकडून अद्यापही शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(२३) ४९५५४ (२७-०४-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेल्या ४-५ वर्षात हवामानातील बदलामुळे राज्यात वारंवार दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली असताना व सन २०१५ च्या खरीप हंगामातील पर्जन्यमान असमाधानकारक झाल्याने दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभुमीवर शेतकऱ्यांचा पीककर्ज घेण्याकडे कल वाढला असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षीच्या तुलनेत राज्यातील बँकांनी खरीप हंगामासाठी वाटप केलेले कर्ज फक्त ६० टक्केच्या आसपासच होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सततची दुष्काळी परिस्थिती व आर्थिक अडचण यामुळे शेतकऱ्यांचा पिककर्ज घेणे व पिकांचा विमा उतरविणे याकडे कल वाढलेला असतानासुद्धा नागरी बँकांकडून अद्यापही शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कर्ज वितरण प्रक्रियेवेळी अतिरिक्त यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे बरेचसे शेतकरी कर्जापासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पिककर्ज वाटप, पिकविमा इत्यादी वाढीसाठी शासनामार्फत कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहेत, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१३-१०-२०१६)** :(१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) नाही.
(५) पीक कर्ज वाटपाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांनी दि.२८.०४.२०१६ च्या राज्यस्तरीय खरीप आढावा सभेमध्ये विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व अन्य अधिका-यांना पीक कर्जवाटपांसाठी पुढाकार घेण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच दि.११.०५.२०१६ च्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीमध्ये पीक कर्ज वाटपाबाबत बँकाना सकारात्मक राहण्याच्या सुचना दिल्या आहेत. याच अनुषंगाने मा.पालकमंत्री यांनीही त्यांच्या जिल्ह्यामध्ये जूनच्या पहिल्या आठवड्यामध्ये बँकर्स व क्षेत्रीय अधिका-यांची सभा आयोजित करुन आवश्यक कार्यवाहीच्या सुचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे मा.मुख्यमंत्री यांनी पीक कर्ज वाटपाच्या प्रगतीचा आढावा दि.०३.०६.२०१६ व दि.२७.०६.२०१६ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारा जिल्हाधिकारी व क्षेत्रिय अधिका-यांसमवेत घेतला आहे. माहे ऑगस्ट अखेर ४४,८२,२०५ शेतक-यांना रु.३०,२१० कोटीचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे. परिणामस्वरुप माहे ऑगस्ट अखेर मागील वर्षाच्या तुलनेमध्ये पीक कर्ज वितरणामध्ये २,६२,७१९ वाढीव शेतक-यांना रु.३५७६ कोटीचे वाढीव पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे.

---

**श्रीरामपुर (जि.अहमदनगर) येथील एमआयडीसी राखीव क्षेत्रात उद्योग सुरु करण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२४) ४९६९० (२७-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीरामपुर (जि.अहमदनगर) येथील एमआयडीसी राखीव क्षेत्रात उद्योग सुरु करण्यासाठी भूखंड उपलब्ध असतानाही ते देण्याबाबत अधिकाऱ्याकडून कार्यवाही होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच मागणी केल्या उद्योजकांना उद्योग सुरु करण्यासाठी भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
श्रीरामपूर औद्योगिक क्षेत्राकरिता सरकारी ३१.५४ हे.आर व खाजगी ३३२.०३ हे.आर. असे एकूण ३६३.५७ हे आरे क्षेत्र सन १९८८-८९ मध्ये महामंडळाच्या ताब्यात आलेले असून त्यावर महामंडळाने ६९० विविध आकाराचे भूखंड पाडले आहेत. त्यामधील औद्योगिक ४३६, व्यापारी २६, सुविधा भूखंड ५ अशा एकूण ४६७ भूखंडाचे वाटप केलेले असून २२३ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत. सद्य:स्थितीत १६९ भूखंडाच्या संदर्भात मागणी अज प्राप्त झाले असून ज्येष्ठता यादीनुसार दिनांक ३/३/२०१६ रोजी २० अर्जदारांची व दिनांक ५/५/२०१६ रोजी अर्जदारांची भूखंड वाटप समितीने मुलाखत घेतली आहे. तसेच ८ गैरहजर अर्जदारांचे अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे भुखंड वाटपाची कार्यवाही सुरु असून ज्येष्ठता यादीनुसार अर्जदारांच्या मुलाखती घेण्याचीही कार्यवाही सुरु आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीयकृत बँका आणि वित्त संस्थांना कृषी क्षेत्रासाठी शासनाने ठरवून दिलेल्या उद्दिष्टांनुसार देय असलेले वित्त सहाय्य थेट शेतकऱ्यांना मिळण्यासाठी शासनाने उपाययोजना करणेबाबत**

**(२५) ५०४४८ (२७-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी क्षेत्राला कर्जवाटप केल्याचे उद्धिष्ट साध्य केल्याचे दाखवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका आणि वित्त संस्थांनी खाजगी कंपन्यांना कोट्यावधी रुपये वेअर हाऊसेस बांधण्यासाठी दिल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरमन उघडकीस आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची राज्य शासनाच्या वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनने शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) ची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच कृषी क्षेत्रासाठी शासनाने ठरवून दिलेल्या उद्दिष्टांनुसार देय असलेले वित्त सहाय्य थेट शेतकऱ्यांना मिळण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-१०-२०१६) :**(१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) (१) राज्यातील शेतक-यांकडील लागवडीखालील क्षेत्र या क्षेत्रावरील पिक पेरा त्याचप्रमाणे पिक निहाय कर्जदार विचारात घेऊन खरीप हंगामाच्या पूर्वी नाबार्डने राज्यासाठी रु.५४३५२ कोटी पिक कर्ज वाटपाच्या जिल्हा निहाय क्षमता धिष्टीत आराखडा तयार केलेला आहे. या आराखड्याप्रमाणे जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समन्वय समितीद्वारा जिल्ह्यातील प्रत्येक बँकेसाठी पिक कर्ज वाटपाचा लक्षांक निश्चित करुन देण्यात आला आहे.

(२) जिल्हास्तरीय समन्वय समितीने तयार केलेल्या जिल्हा पतपुरवठा आराखड्याचे एकत्रिकरण राज्यस्तरीय बँकर्स समिती द्वारा करण्यात आले असून राजयासाठी एकूण रु.५१२३५ कोटी पिक कर्ज वाटपाचा लक्षांक निश्चित करण्यात आलेला आहे. यामध्ये खरीप पिक कर्ज वाटपासाठी रु.३६६७७ कोटी व रब्बी हंगामासाठी रु.१३५५८ कोटी पिक कर्ज वाटपाचा लक्षांक निश्चित करण्यात आला आहे.

(३) राजयातील शेतक-यांना द्यावयाच्या पिक कर्जाबाबत तसेच दुष्काळग्रस्त भागातील शेतक-यांच्या पिक कर्ज पुनर्गठनाबाबत मा.मुख्यमंत्री यांनी दि.२८.४.२०१६ रोजीच्या राज्यस्तरीय खरीप आढावा सभेमध्ये सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी तसेच सहकार विभागाचे क्षेत्रिय अधिकारी यांना सकारात्मक पुढाकार घेण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

(४) मा.मुख्यमंत्री महोदय, यांनी दि.११.५.२०१६ रोजीच्या राज्यस्तरीय बँकर्स समिती सभेमध्ये राजयातील सर्व बँकाना (सार्वजनिक क्षेत्रातील, खाजगी क्षेत्रातील तसेच ग्रामीण बँका व जिल्हा सहकारी बँका) पीक कर्ज वितरणाच्या अनुषंगाने उचित कार्यवाहीच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे मा.मुख्यमंत्री यांनी दि.३.६.२०१६ व २७/६/२०१६ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारा सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व सहकार विभागातील क्षेत्रिय अधिकारी यांच्यासमवेत वार्तालाप करुन आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या आहेत.

(५) उक्त प्रमाणे कार्यवाही झाल्यामुळे दि.३१.८.२०१६ अखेर रु.३७६७७ कोटी खरीप पिक कर्ज लक्षांकापैकी रु.३०२१० कोटीचे पिक कर्ज वाटप बँकांनी ४४.८२ लाख शेतक-यांना करुन ८० % लक्षांक पूर्तता केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जातपडताळणी प्रमाणपत्र मिळाणेसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र कार्यालय उभारण्याबाबत

**(२६) ५१००० (२८-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जातपडताळणी प्रमाणपत्र नागरिकांना सहज व लवकार मिळावे यासाठी प्रत्येक

जिल्ह्यात स्वतंत्र कार्यालय उभारण्याचा शासनाचा निर्णय अद्याप अमंलात आणला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर निर्णय अंमलात यावा यासाठी जिल्ह्यावर जातपडताळणी कार्यालये सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-१०-२०१६) :**(१) व (२) शासन निर्णय दिनांक १ जून, २०१६ अन्वये जिल्हास्तरीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकरीता विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांवरील ३१२ पदांपैकी ७६ पदे निरसीत करुन नव्याने ११५ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र भाग ४-ब, क्रमांक १९७, दि.२८/७/२०१६ अन्वये समित्यांची रचना व त्यांचे कार्यक्षेत्र अधिसुचित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात मुलभूत सुविधा पथदिवे, नादुरुस्त रस्ते, जलनि:सारण सुविधा, कचरा संकलन इत्यादी संबंधी महानगरपालिकेच्या उदासिनतेबाबत**

**(२७) ५१५७० (२७-०४-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात मुलभूत सुविधा पथदिवे, नादुरुस्त रस्ते, जलनि:सारण सुविधा, कचरा संकलन इत्यादी संबंधी महानगरपालिकेच्या उदासिनतेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन संबंधित विभागांना दिलेले असूनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्रात इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात वीज दर आकारणी जास्त असल्याने बहुतांश उद्योग बंद पडलेले आहेत, जळगांव औद्योगिक क्षेत्रात स्वतंत्र प्रशासकीय कार्यालय नसल्याने स्थानिक उद्योजकांना धुळे येथील विभागीय कार्यालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धुळे येथील विभागीय कार्यालय जळगाव येथे होणेसाठी शासन कोणती उपाययोजना वा कार्यवाही करणार आहे,
(४) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

१. सहकारी औद्योगिक वसाहत व अति. जळगांव औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण ४२.९० कि.मी. लांबीचे रस्ते बांधण्यात आलेले आहेत. सन १९८९ साली नगरपालिकेस हस्तांतरीत केलेल्या रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती नगरपालिकेने न केल्यामुळे औद्योगिक संघटनांच्या मागणीनुसार रस्ते, पथदिवे यांच्या दुरुस्तीचे काम महामंडळाने हाती घेतले असून काम प्रगतीपथावर आहे.

२. जळगांव औद्योगिक क्षेत्रातील २१५ पथदिव्यांची दुरुस्ती  करण्यात आल असून १३२० नविन पथदिव्यांची निविदा काढून काम हाती घेण्यात येणार आहे.

३. औद्योगिक क्षेत्रात एकूण ४१.६८ कि.मी. लांबीच्या विविध व्यासांच्या जलवितरण वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत औद्योगिक क्षेत्राकरिता १८ कि.मी लांबीच्या ७००मी.मी. व्यासाच्या पाईपलाईनमधून११ द.ल.घ.मी. प्रति दिन पाणीपुवठा केला जात आहे.

४. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतर्फे १x२० एमव्हीए, २x५ एमव्हीए व १x१५ एमव्हीए क्षमतेची उपकेंद्रे उभारण्यात आली असून मुबलक वीज पुरवठा आहे.

५. महामंडळाने अग्निशमन केंद्र बांधले असून ते पुढील कार्यवाहीकरिता जळगांव महानगरपालिकेस हस्तांतरीत केले आहे. तसेच पोलीस स्टेशन, दूरध्वनी केंद्र, पोस्ट ऑफीस, बँक, हॉटेल्स या सुविधाही सदर औद्योगिक क्षेत्रात उपलबध आहेत.

(२) महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना वीज दर कमी करण्यासंदर्भात संबंधीत विभागाशी विचार विनिमय करुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

जळगांव येथील अभियांत्रिकी कामासाठी एक उपविभागीय कार्यालय व भूखंडाच्या जमिनीबाबतच्या कामासाठी एक क्षेत्रव्यवस्थापक कार्यालय अशा दोन कार्यालयांमार्फत उद्योजकांची कामे केली जात आहेत.

(३) धुळे येथील विभागीय कार्यालय जळगाव येथे स्थलांतरीत करण्यासंबंधी कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही.

(४) उक्त बाब १ व २ बाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील दुकाने पहाटेपर्यंत सुरु ठेवण्याबाबत

**(२८) ५१७८३ (१७-०५-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दुकाने पहाटे ५ पासून रात्री ११ वाजेपर्यंत सुरु ठेवण्याची तरतूद असलेल्या किरकोळ आस्थापना धोरणात दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हा पासून होणार आहे,

(३) अद्यापही या धोरणाची अंमलबजावणी झाली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२९-०८-२०१६)** :(१), (२) व (३) शासन निर्णय क्र.किविधो-२०१५/प्र.क्र.११३/उद्योग-२, दिनांक १०/०२/२०१६ अन्वये राज्याचे किरकोळ व्यापार धोरण-२०१६ जाहीर करण्यात आले असून धोरणातील कामाचे तास याबाबतची तरतूद पुढीलप्रमाणे आहे :

i) "किरकोळ उपक्रमांना वर्षभर प्रत्येक दिवशी खुले राहण्याची अनुमती देण्यात येईल ज्याद्वारे कामगारवर्ग आणि इतर वर्गांच्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणे शक्य होईल. परंतु सर्व कर्मचाऱ्यांना पसंती क्रमानुसार साप्ताहिक सुटी देणे अनिवार्य असेल.

ii) जे किरकोळ उपक्रम सर्व वस्तु आणि माल यांचा व्यवहार करतात त्यांना सकाळी ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत व्यवसाय करण्याची मुभा देण्यात येईल. तसेच फक्त लॉजिस्टिक्स आणि पुरवठा या कारणांसाठी हे उपक्रम रात्री ११ ते सकाळी ५ वाजेपर्यंत खुले राहू शकतील."

तसेच कामगार विभागाने उपरोक्त धोरणाच्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या दिनांक १७.३.२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदित सर्व दुकानांना कलम १८ मधून सुट देताना आस्थापना वर्षातील सर्व दिवस उघडी ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली आहे तसेच, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ मधील कलम १० व कलम ११ नुसार खालील तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

कलम १० :- (१) (अ) सर्वस्वी दूध, भाजीपाला, फळफळावळ, मासळी, मांस पाव किंवा [राज्य] शासन अधिसूचित करील असा कोणताही इतर माल यांचा व्यवहार करणारे कोणतेही दुकान कोणत्याही दिवशी सकाळी ५.०० वाजण्यापूर्वी उघडता येणार नाही.

(ब) खंड (अ) मध्ये विर्निदिष्ट केलेल्या दुकानाहून अन्य कोणतेही दुकान सकाळी ७.०० वाजण्यापूर्वी उघडता येणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदीच्या अधीनतेने [राज्य] शासनास दुकानांच्या निरनिराळ्या वर्गासाठी किंवा निरनिराळ्या क्षेत्रासाठी किंवा वर्षभरातील निरनिराळ्या कालावधीसाठी दुकाने उघडण्याच्या त्याहून उशिराच्या वेळा ठरविता येतील.

कलम ११ :- (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, -- (अ) या पोट कलमाच्या खंड (ब) मध्ये विर्निदिष्ट केलेल्या दुकानांहून अन्य कोणतेही दुकान अन्य कोणतेही दुकान कोणत्याही दिवशी रात्री १०.०० पेक्षा उशिरा बंद करता येणार नाही.

(ब) पान बिडी सिगारेट, आगपेट्या व त्यासाठी लागणाऱ्या इतर वस्तू यांचाच मुख्यत्वेकरुन व्यापार करणारे कोणतेही दुकान रात्री ११.०० पेक्षा उशिरा बंद करता येणार नाही.

तसेच फक्त लॉजिटिक्स आणि पुरवठा या कारणांसाठी उपक्रम रात्री ११ ते सकाळी ५ वाजेपर्यंत खुले राहण्याच्या अनुषंगाने अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

---

**नांदगांव पेठ, (जि.अमरावती) एम.आय.डी.सी. औद्योगिक क्षेत्र औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी जमीन भूसंपदानाचा योग्य तो मोबदला देण्याबाबत**

**(२९) ५२१४० (२७-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील नांदगांव पेठ, एम.आय.डी.सी. औद्योगिक क्षेत्र औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी प्रस्तावित रेल्वे लाईनच्या भुसंपादनाने तुकडा पडलेल्या ०.२० हे. आर. चे वर जमीनीचे भूसंपदान करुन योग्य तो मोबदला देण्यात यावा, याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबबात कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, कार्यवाहीचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) औष्णिक विद्युत प्रकल्पसाठी टाकण्यात आलेल्या रेल्वे लाईनच्या भूंपादनाने तुकडा पडलेल्या ०.२० हे.आर पेक्षा जास्त क्षेत्र असलेली ५.११.०० हे.आर जमिन महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १५ (ब) नुसार खरेदी करण्यास मे.इंडीया बुल्स पॉवर लिमिटेड कंपनी तयार असेल तर महामंडळातर्फे खरेदी करण्यात येईल असे कंपनीस कळविण्यात आले होते. तथापि कंपनीने ०.२० हे.आर खेत्रापेक्षा जास्त क्षेत्र असलेली जमिन कंपनीस घेणे शक्य होणार नाही असे कळविले आहे. मात्र कोणत्याही शेतकऱ्याची ०.२० हे.आर पेक्षा कमी क्षेत्राची जमिन असेल तर ती जमिन स्वतंत्र चौकशी करुन खरेदी करण्यास कंपनीने तयारी दर्शवलेली आहे, तथापि महामंडळाने पुन्हा इंडीया बुल्स पॉवर लिमिटेड कंपनीस रकमेचा भारणा करण्याबाबत कळविले आहे. सदर कंपनीने मोबदला रकमेचा भरणा केल्यास महामंडळातर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील, पांढरेवाडी, रोटी, मळद, गिरिम या गावांचे जलस्त्रोत एमआयडीसी मधील रसायने जमिनीत मुरल्याने प्रदूषित झालेबाबत**

**(३०) ५२२७४ (२७-०४-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा पुणे, तालुका दौंड येथील मौजे कुरकुंभ, पांढरेवाडी, रोटी, मळद, गिरिम या गावांचे जलस्त्रोत एमआयडीसी मधील रसायने जमिनीत मुरल्याने प्रदूषित झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांना शुद्ध पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी दिनांक २०.१०.२०१५ रोजी वा त्या सुमारास मा. उद्योग मंत्री यांच्या मुंबई येथील दालनात झालेल्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) कुरकुंभ गावाच्या परिसरामधील विंधन विहीरींचे व सार्वजनिक विहीरींचे उद्भव दूषित झाल्यामुळे या गावातील पिण्याचे पाण्याचे उद्भव वापरासाठी बंद करण्यात आले होते. तथापि मळद व गिरिम या गावातील पाणी दूषित झालेले नाही व कुरकुंभ सीईटीपीचे सांडपाणी सध्या रोटी गावात जात नाही.

(२) मा.आमदार ॲड.राहुल कुल यांच्या दिनांक १४/१०/२०१५ च्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.उद्योगमंत्री यांच्या समवेत दिनांक २७.१०.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरल्यानुसार भिमा सहकारी साखर कारखाना, मधुकरनगर पाटस यांना महाराष्ट्र औद्येगिक विकास महामंडळाच्या अशुध्द जलवाहिनी वरील पाटस गावाजवळील साखळी क्रमांक ४६०० वरील एअरवॉलवर कनेक्शन करुन दिनांक ०९.०१.२०१६ ते १२.०२.२०१६ व दिनांक ०५.०४.२०१६ ते २०.०४.२०१६ पर्यंत ५० किमी व्यासाच्या कनेक्शनद्वारे प्रति दिन ५०० ते ६०० घ.मी. एवढा पाणी पुरवठा करण्यात येत होता. परंतु दिनांक २१.०४.२०१६ पासून वरवंड जलशयातील साठा पूर्णत: संपल्यामुळे औद्योगिक क्षेत्र तसेच सदर कारखान्याचा पाणी पुरवठा खंडीत झाला होता. तथापि, जलसंपदा विभागाने वरवंड धरणात कालव्याद्वारे पाणी सोडल्यामुळे कुरकुंभ औद्योगिक क्षेत्र व कुरकुंभ तसेच पांढरेवाडी ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा दि.१३/०५/२०१६ पासून पुन्हा सुरु झाला आहे. तसेच महामंडळामार्फत कुरकुंभ ग्रामपंचायतीस माहे मे २००० पासून ४० मि.मी. व्यासाच्या व पांढरेवाडी ग्रामपंचायतीस माहे सप्टेंबर, १९९८ पासून ८० मि.मी. व्यासाच्या नळ जोडणी द्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

महामंडळ कुरकुंभ व पांढरेवाडी ग्रामपंचायती भूपीडीत असल्याने त्यांना रु.३.०० प्रती घ.मी. हा सवलतीचा दर आकारीत आहे. कुरकुंभ ग्रामपंचायतीकडे रु.२३६.३६ लक्ष व पांढरेवाडरी ग्रामपंचायतीकडे रु.१६४.०२ लक्ष पाणीपट्टी थकबाकी असूनही महामंडळ त्याना शुध्द पाण्याचा पुरवठा करीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यात ६० टक्के पाणी कपात केल्याने तेथील उद्योग व्यवसाय संकटात सापडले असल्याबाबत

**(३१) ५२३५० (२७-०४-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात ६० टक्के पाणी कपात केल्याने तेथील उद्योग व्यवसाय संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठ्याची पर्यायी यंत्रणा नसल्याने कारखानदारांना कारखाने बंद ठेवावे लागल्याने अनेक मजुर कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उद्योग बंद ठेवल्यामुळे कारखानदारांचे आर्थिक नुकसान होऊन शासनाच्या महसूलातही घट येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाकडून पाणी पुरवठ्याबाबतची पर्यायी व्यवस्था केली आहे काय, वा करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, तिचे नेमके स्वरुप कसे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) बारवी पाणी पुरवठा योजनेतून अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ, बदलापूर, डोंबिवली, तळोजा, टी.टी.सी., वागळे इस्टेट या औद्योगिक क्षेत्रास पाणीपुरवठा करण्यात येत असून बारवी व आंद्र धरणातील पाणीसाठा अपुरा असल्यामुळे जलसंपदा विभागाच्या निर्देशानुसार औद्योगिक क्षेत्रामध्ये दिनांक २२/१०/२०१५ ते १४/२/२०१६ पर्यंत २९% दिनांक १५/२/२०१६ ते ८/३/२०१६ पर्यंत ३६% व दिनांक ९/३/२०१६ पासून ५२% पाणी कपात लागू करण्यात आली आहे व आठवड्यातून २ ते २.५ दिवस पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येत आहे. तसेच कल्याण-भिवंडी औद्योगिक क्षेत्रासही ठाणे महानगरपालिकेच्या भातसा पाणीपुवठा योजनेतून बार्टर पध्दतीने केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्यातही दिनांक १९/११/२०१५ ते १६/२/२०१६ पर्यंत २९% व दिनांक १७/२/२०१६ पासून ३६% पाणीकपात लागू करण्यात आली असून आठवडृयातून २ ते २.५ दिवस पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) गेल्या ३-४ वर्षापासून अपुऱ्या पावसाअभावी पाणी पुरवठ्यामध्ये कपात करण्यात आली आहे त्यामुळे महसूल कमी होणे अपरिहार्य आहे.
(४) व (५) बारवी पाणी पुरवठा करणाऱ्या धरणाची उंची वाढविण्याचे काम प्रगतीपथावर असून धरणाची उंची वाढविण्याचे काम पूर्ण झाल्यावर धरणाची पाणीपुरवठा क्षमता ६०० द.ल.लि.प्रति दिन वरुन १०३५ द.ल.लि. प्रति दिन एवढी होणार असून त्या प्रमाणात जलसंपदा विभागाकडून पाण्याचे नियोजन करण्यात येईल.

---

**मौजे खेर्डी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची जमिन शेतीकरीता शासकिय दरात देण्याबाबत**

**(३२) ५३४९५ (२७-०४-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे खेर्डी (ता. चिपळूण) येथील नगर भूमापन क्र. १६५५ अ व क, आणि नगर भूमापन क्र. १६५६ अ, ब, क ही गाळाने तयार झालेली मळईची जमीन शेतीकरीता शासकिय दरात मिळावी अशी मागणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रकल्पग्रस्त शेतकरी सन २००० पासून सातत्याने शासनाकडे करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीची मागणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळानेही केली असून सदर मागणी महामंडळाने त्यांच्या ताब्यात असलेल्या लगतच्या एका भूखंडधारकाला दिल्यानंतर संबंधित भूखंडधारकाचे बांधकाम नियमबाह्य होत असलेकारणाने त्यांच्या चूकीच्या भूखंड वितरण पध्दतीवर आक्षेप येवू नये म्हणून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमीन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शेती प्रयोजनार्थ कायमस्वरुपी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) याबाबत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी पत्रव्यवहार केलेला निदर्शनास आलेला नाही.

(२) व (३) खेर्डी औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र.पी-३१ चा ताबा भूखंडधारकास दिनांक १७/४/२००६ रोजी देण्यात आलेला आहे. तथापि त्या भूखंडधारकास महामंडळातर्फे रस्ता उपलब्ध नसल्यामुळे भूमापन क्र.१६५५ अ व क आणि नगर भूमापन क्र. १६५६ अ, ब, व क क्षेत्राच्या खरेदीचा प्रस्ताव महामंडळाने जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे पाठविला आहे. तथापि जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दिनांक १५/२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविलेला जमिनीचा दर महामंडळास आर्थिकदृष्ट्या परवडणारा नाही. त्यामुळे महामंडळाच्या औद्योगिक दराच्या ५०% म्हणजेच १६५ प्रती चौ.मी. प्रमाणे उक्त क्षेत्र जिल्हाधिकारी यांनी महामंडळाकडे वर्ग केल्यास सदर क्षेत्र ताब्यात घेणे महामंडळस शक्य होईल असे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना दिनांक ७/४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये महामंडळातर्फे कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पूर्णा (जि.परभणी) नगरपालिकेने जुने कामे दाखवून दलित वस्ती विकास निधीचा अपहार केल्याबाबत

**(३३) ५३५३४ (२०-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा नगरपालिकेच्या (जि.परभणी) हद्दीतील दलित वस्तीत विकासकामे करण्यासाठी राज्य शासनाने मंजूर केलेला ४ कोटी ४३ लाख ९४ हजार रुपयांचा निधी दलित वस्तीतील विविध योजनांच्या माध्यमातून झालेली कामे नव्याने दाखवून नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी अपहार केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी दि.२० डिसेंबर, २०१५ रोजी जिल्हा नगरपरिषद प्रशासन अधिकारी यांच्याकडून चौकशी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्यांने नगरपालिकेने दाखविलेल्या ९ कामांपैकी ८ कामे जुनीच असून १ काम दलित वस्ती बाहेरचे असल्याचे निष्पन्न झाले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :**
(१), (२), (३) व (४)

* नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये रु.२ कोटी ४३ लक्ष ९४ हजार इतका निधी पूर्णा नगरपरिषदेस जिल्हास्तर समितीकडून वितरीत करण्यात आलेला आहे.

* या निधीतून हाती घ्यावयाच्या कामासंदर्भात पूर्णा नगरपरिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला.

* यासंदर्भात पूर्वी विविध योजनेत झालेली जुनी कामे पुन्हा प्रस्तावित केली असल्याची तक्रार जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे प्राप्त झाली.

* त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करण्याविषयी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना कळविण्यात आले आहे.

* सदर चौकशीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास अद्‌याप प्राप्त झालेला नाही.

* नगरपरिषद पूर्णा यांनी मागणी केलेल्या १२ कामांपैकी तक्रारीतील ८ कामे वगळून उर्वरित ४ कामांना दि.६.२.२०१६ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

* तसेच सदर निधीचा अद्‌याप विनियोग झालेला नसल्याने मुख्याधिकारी व नगराध्यक्ष पूर्णा नगरपरिषद यांनी निधीचा अपहार केला असे म्हणता येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेतक-यांना एफआरपीप्रमाणे ऊसाचे पैसे न देणा-या खासगी व सहकारी साखर कारखान्यांवर सहकार विभागाने कारवाई सुरु केल्याबाबत

**(३४) ५४५९३ (२२-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतक-यांना एफआरपीप्रमाणे ऊसाचे पैसे देण्याबाबत वारंवार इशारा देऊनही पैसे न देणा-या खासगी व सहकारी साखर कारखान्यांवर सहकार विभागाने कारवाई सुरु केली असल्याचे नुकतेच माहे एप्रिल,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारवाई कोणकोणत्या जिल्ह्यातील किती कारखान्यांवर करण्यात आली आहे, तसेच सदर कारखान्यांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे,
(३) उक्त कारखान्यांवर दंडात्मक कारवाई केली असल्यास आतापर्यंत किती रक्कमेची वसुली करण्यात आली आहे
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१३-१०-२०१६) :** (१) व (२) होय अंशतः खरे आहे.

हंगाम सुरु झालेपासून कारखान्यांना विहित मुदतीत शेतक-यांना FRP अदा करणेच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

गळती हंगाम २०१४-१५ व २०१५-१६ मधील FRP देयके जादा थकबाकी असाणाऱ्या साखर कारखान्यांवर ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील तरतुदीनुसार RRC कारवाई करणे व झोनिंग आदेश, १९८४ मधील तरतुदीनुसार गाळप परवाना रद्द करुन दंडात्मक कारवाई करणे इ. कारवाई करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे

अ) हंगाम २०१४-१५ मधील नांदेड, उस्मानाबाद, सातारा, सोलापूर, परभणी, सांगली, जळगांव, लातूर, अहमदनगर, बीड, हिंगोली, पुणे ह्या जिल्ह्यातील (१२ सहकारी व ११ खाजगी) २३ कारखान्यांवर रु.३१२.७३ कोटी व हंगाम २०१५-१६ मधील सांगली, सोलापूर, जळगांव, यवतमाळ, परभणी, पुणे ह्या जिल्ह्यातील (१० सहकारी व ०३ खाजगी) १३ साखर कारखान्यांवर रु.१६४.५२ कोटी रक्कमेची RRC कारवाई करण्यात आली आहे.

ब) हंगाम २०१४-१५ चे थकीत FRP मुळे हंगाम २०१५-१६ चे गाळप परवाने रद्द करुन सांगली, पुणे, सोलापूर, अहमदनगर, जळगांव ह्या जिल्हातील (०८ सहकारी व ०२ खाजगी) १० कारखान्यांवर रु.९३.६३ कोटी रक्कमेचा दंड व हंगाम २०१५-१६ मधील थकीत FRP मुळे सांगली, पुणे, सोलापूर, औरंगाबाद, परभणी, यवतमाळ, जालना, अहमदनगर, नाशिक ह्या जिल्हातील (१० सहकारी व ०७ खाजगी) १७ कारखान्यांवर रु.१८३.८९ कोटी रक्कमेच्या दंडाचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) दि.३१.०८.२०१६ पर्यंत RRC आदेशाचे अनुषंगाने हंगाम २०१४-१५ मधील रु.३१२.७३ कोटी पैकी रु.१४९.७५ कोटी वसुल करण्यात आले असून रु.१६२.९८ कोटी थकीत आहेत. तर हंगाम २०१५-१६ मधील रु.१६४.५२ कोटी पैकी रु.९५.४३ कोटी रक्कम वसूल करण्यात आली असून रु.६९.९ कोटी थकीत आहेत. तर गाळप परवाने रद्द बाबतच्या अनुक्रमे रु.९३.६३ कोटी रु.१८३.८९ कोटी देड रक्कमांची वसुली झालेली नाही.

(४) साखर आयुक्तालयाकडील उक्त आदेशाविरुध्द कारखान्यांनी मा.विविध न्यायालयामध्ये अपील दाखल करणे, मा.सहकार मंत्री महोदय यांचेकडे कलम १५४ अन्वये पुनर्विलोकन अर्ज दाखल करणे, त्यांचेकडील सुनावणी प्रलंबित असणे, जिल्हाधिकारी कार्यालयांचे स्तरावर वसुली कारवाई प्रलंबित असणे इ. कारणांमुळे दंडात्मक कारवाईच्या रक्कमांची संपूर्ण वसुली झालेली नाही.

---

**आदिवासी विकास विभागाने खरेदी केलेल्या तांदळाची भरडाई तसेच नोकर भरतीतील गैरव्यवहार प्रकरणी महामंडळाचे महाव्यवस्थापक यांच्यासह चार वरिष्ठ अधिकाऱ्यांना शासनाने निलंबित केल्याबाबत**

**(३५) ५४८११ (१२-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाने खरेदी केलेल्या तांदळाची भरडाई तसेच नोकर भरतीतील गैरव्यवहार प्रकरणी महामंडळाचे महाव्यवस्थापक यांच्यासह चार वरिष्ठ अधिकाऱ्यांना शासनाने निलंबित केल्याची धक्कादायक माहिती दिनांक २ जून, २०१६ रोजी वा त्या उघडकीस आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दोषींविरुध्द गुन्हा नोंदवून त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) तसेच संबंधित दोषींविरुध्द चौकशीनंतर कोणती कारवाई करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील साखर उद्योगाच्या समस्यांबाबत**

**(३६) ५५६९३ (२२-०८-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात साखरेच्या दरात सतत होणारी घट यामुळे संकटात सापडलेल्या साखर उद्योगाच्या पुनर्रचनेबरोबर या उद्योगाला वाचविण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे मागणी करणार असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर कारखान्यांच्या सुमारे ७२ हजार कोटी रुपयांच्या कर्जाची फेररचना, विविध करात सवलत, सुलभ कर्ज उपलब्ध करुन देण्याची तसेच ऊसापासून पाणीसंकट निर्माण होत असल्याने कर्नाटकात पाणी बचतीबाबत केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करुन ती पध्दत राज्यात प्रयोगिक तत्वावर लागू करण्याची मागणी राज्य शासनाकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील साखर उद्योगाला संजीवनी देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन साखर उद्योग वाचविण्यसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-१०-२०१६) :** (१) अशंत: खरे आहे.

राज्यातील काही साखर कारखान्यांनी कर्जाची फेररचना करणेबाबत विनंती केल्यानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरून दिनांक ३१/३/२०१६ च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे.

(२) व (३) हंगाम २०१४-१५ ची एमआरपी देणेकरिता केंद्र शासन अधिसूचना दिनांक २३/६/२०१५ चे धर्तीवर शासनाने शासन निर्णय दिनांक ३०/७/२०१५, दिनांक ५/९/२०१५, ९/१२/२०१५ व दिनांक २१/४/२०१५ अन्वये सॉफट लोन योजना जाहिर केलेली आहे.

ऊस खरेदी कराबाबत शासन राजपत्र दिनांक २६/४/२०१६ नुसार हंगाम २०१५-१६ मधील ऊस खरेदीकर माफ केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### धुळे जिल्ह्यात दलित वस्ती सुधार योजनेचा अनुशेष मोठ्या प्रमाणावर असल्याबाबत

**(३७) ५५७१६ (२०-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेचा धुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अनुशेष असून जिल्हातील १६ गावे या योजनेअंतर्गत विकासापासून वंचित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित गावांमध्ये विकास कामे तात्काळ मार्गी लावण्यासाठी शासनाने कोणती पावले उचलली आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-१०-२०१६) :**(१), (२) व (३) पंचायत समिती स्तरावरुन १६ गावांचे प्रस्ताव मंजूरीस्तव प्राप्त न झाल्याने धुळे जिल्ह्यातील १६ गांवांना दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत लाभ देण्यात आलेला नाही.

---

### धुळे जिल्ह्यात शेतकऱ्यांना कमी भावात कांदा विक्री करुन तोटा सहन करावा लागत असल्याबाबत

**(३८) ५५८४१ (२२-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांवर अतिशय कमी भावात कांदा विक्री करुन तोटा सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या कांद्याला जास्तीचा भाव मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०९-२०१६) :**(१) नाही.

धुळे जिल्ह्यातील धुळे, साक्री व शिरपूर या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मे, २०१६ मध्ये आवक झालेल्या कांद्याला प्रतीनुसार सरासरी रुपये ३८०-५५० प्रति क्विंटल बाजारभाव मिळाला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्याला हमीभाव आणि अर्थिक मदत मिळणेबाबत

**(३९) ५६१७४ (२२-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांद्याला २००० रुपये प्रती कींटल हमी भाव मिळावा या प्रमुख मागणीसाठी लासलगाव जि.नाशिक बाजार समितीचया आवरासमोर शेतकरी संघटनेच्या वतीने रास्ता रोको करुन शासनाला दिनांक ७ मे, २०१६ रोली निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्याला हमीभाव आणि अर्थिक मदत मिळणेबाबत तसेच शेतकऱ्यांच्या इतर मागण्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २५/५/२०१६ रोजी लेखी मागणी करणारे पत्र लिहून मोफत कांदा विक्री आंदोलनाचा इशारा दिला होता हे खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने आंदोलनकर्त्यांच्या मागण्या काय आहेत याचा आढावा घेतला आहे काय,

(४) असल्यास, शासन शेतक-यांकडून फक्त १५ हजार मे.टन कांदा खरेदी करणार आहे. हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतक-यांला कांद्यासाठी १३ रुपये प्रती किला उत्पादन खर्च होत असल्याने कांदा ५ रुपये किलो ने विकला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, कांद्याला २००० रुपये प्रती कीटल हमीभाव देण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया,

(७) तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-१०-२०१६) :**(१) होय.

तथापि कांद्याला हमीभाव मिळावा यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते.

(२) नाही.

लासलगांव बाजार समितीचे सभापती श्री.जयदत्त होळकर यांनी शासन दरबारी कांदा बाजारभावातील तफावत दुर करणेसाठी शासन स्तरावर उपाययोजना करणेबाबत दिनांक २१/५/२०१६ रोजी निवेदन दिले आहे.

(३) होय.

(४) केंद्र शासनाने किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये २४८८ मे.टन कांदा खरेदी केलेला आहे.

(५) एन.एच.डी.एफ.लासलगांव यांच्या २०१४-१५ च्या अहवालानुसार, हंगामानिहाय कांद्याच्या उत्पादन खर्च सरासरी रु ७००ते ८०० प्रति. क्विंटल आहे.

माहे मे ते ऑगस्ट, २०१६ अखेर या कालावधीत लासलगांव बाजार समितीत कांद्याची आवक व सरासरी दर खालील प्रमाणे आहेत.

| **कालावधी** | **आवक (क्विंटल)** | **सरासरी दर (प्रती क्विंटल)** |
|---|---|---|
| मे-२०१६ | ३,४९,९३७ | ७७०/- |
| जून-२०१६ | २,८७,१२२ | ८४४/- |
| जुलै-२०१६ | ६०,७१८ | ८२९/- |
| ऑगस्ट-२०१६ | २,०७,०७४ | ७२४/- |

(६) शेतमालाला हमीभाव जाहीर करण्याची बाब केंद्र शासनाशी संबंधित आहे. कांदा हे नाशवंत पीक असल्याने कांद्यासाठी हमीभाव जाहीर केला जात नाही.

(७) कांदा उत्पादक शेतक्यांसाठी उपाय योजनेसंदर्भात विविध प्रस्ताव केंद्रशासनास सादर केले असून, त्याबाबत पाठपपूरावा करण्यात येत आहे. तसेच राज्य शासनाकडूनही केंद्र शासन व राज्य शासनाचा ५०:५० टक्के सहभाग असणाऱ्या रुपये १००/- प्रति क्विंटल अनुदान मंजूर करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु असून केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**विदर्भ, मराठवाडा, व उत्तर महाराष्ट्रात वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग घटकांना भांडवली सवलत देण्याबाबत**

**(४०) ५६६०३ (२२-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत विदर्भ, मराठवाडा, व उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग घटकांना १० टक्के भांडवली सवलत योजनेत वस्त्रोद्योग विभागाने आदेश देऊन ८ कोटी ९६ लाख ३२ हजारांची रक्कम भांडवली सवलती पोटी देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व खान्देशातील किती वस्त्रोद्योगाला सवलत देण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-१०-२०१६) :**(१) व (२) वस्त्रोदयोग धोरण २०११-१७ अंतर्गत विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोदयोग घटकांना १० टक्के भांडवली अनुदान देण्याची योजना शासन निर्णय दि.१ मार्च,२०१२ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर योजना सुरू झाल्यापासून दिनांक ६/९/२०१६ पर्यंत विदर्भातील ४०, मराठवाडयातील ५० व उत्तर महाराष्ट्रातील १०८ अशा एकूण १९८ वस्त्रोदयोग घटकांना एकुण रू.१०३८६.३३ लाख इतके भांडवली अनुदान वितरीत करण्यात आले आहे. त्यापैकी विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या एकूण १० वस्त्रोद्योग प्रकल्पांना शासन निर्णय क्र. बैठक २०१६/प्र.क्र.२६२/टेक्स-५ दिनांक ४ मे, २०१६ अन्वये ८ कोटी ९६ लाख ३२ हजार इतकी रक्कम भांडवली सवलतीपोटी वितरीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) खादी ग्रामोद्योग संघाचे काम बंद असल्याबाबत**

**(४१) ५७१९३ (२२-०८-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुका खादी ग्रामोद्योग संघाचे काम दोन महिन्यापासून (मार्च २०१६ पासून) बंद झाल्याने नागरीकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शहापूर तालुका खादी ग्रामोद्योगाचे काम सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-१०-२०१६) :** (१) सदर बाब खरी नसून या कालावधीत सदर कार्यालय सूर असल्याचे मंडळाने कळविले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील उद्‌योगांना योजनेअंतर्गत कोणताच फायदा मिळत नसल्याबाबत**

**(४२) ५७८३९ (२२-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील उद्‌योगांना योजनेअंतर्गत कोणताच फायदा मिळत नसल्याने उद्‌योजकांना महिन्यासाठी शासनाला ६२ टक्के कर भरावा लागत असल्याने गेल्या १० वर्षात जिल्ह्यात एकही मोठ्या उद्‌योगाची स्थापना झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उद्‌योगासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या परवानग्या काढणे सोयीस्कर होण्यासाठी शासनाने एक खिडकी योजनांच्या माध्यमातून सर्व प्रमाणपत्रे देण्याची घोषणा करुनही या घोषणेची नाशिक जिल्ह्यात अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील १) व २) बाबत उद्‌योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनामार्फत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
गेल्या १० वर्षात (सन २००७ ते सन २०१६) शासनातर्फे सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ व २०१३ राबविण्यात येत आहेत. या कालावधीमध्ये दोन्ही योजनांतर्गत नाशिक जिल्ह्यातील मोठया/विशाल उद्‌योगांचे एकंदर ९९ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ४४ उद्‌योगांना पात्रता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आली असून, प्रोत्साहनास पात्र ठरविण्यात आले आहे. नाशिक जिल्हा क,ड व ड+ असा वर्गीकृत असून उद्‌योगांना विविध प्रोत्साहने देय केली आहेत
(२) राज्यात उद्‌योग स्थापन करण्याकरीता सर्व ना हरकती/परवाने /मंजुऱ्या एकाच ठिकाणी उद्‌योजकांना तातडीने व सुलभरित्या प्राप्त होण्याकरीता एक खिडकी योजना राबविण्याचा निर्णय दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ च्या शासननिर्णयान्वये घेण्यात आला. एक खिडकी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी विविध विभागांच्या मैत्री कक्ष सक्षम करण्याकरीता विविध विभागाच्या गट अ ते क संवर्गातील ४१ पदांच्या निर्मितीस दिनांक १८ जुन, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तुत मैत्री कक्ष राज्यस्तरीय असून एक खिडकी योजनेचा लाभ नाशिक जिल्ह्यासह राज्यातील अन्य जिल्ह्यांना देखिल देण्यात येतो.

(३) उद्योजकांच्या समस्या सोडवण्याकरीता देखिल राज्यस्तरावरील मैत्री कक्षा मार्फत प्रयत्न करण्यात येत आहे.

तसेच विभागीय स्तरावर देखिल मैत्री कक्ष स्थापन करण्यात आले असून शासन निर्णय दिनांक २८ जुलै, २०१५ उद्योग सह संचालक, नाशिक कार्यालय यांच्या कार्यालयात मैत्री कक्षाचे गठन करण्यात आले आहे. सदर कक्ष नाशिक परिक्षेत्रातील उद्योजकाच्या समस्या सोडविण्यास मदत करत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ कर्मचारी संघर्ष संघटना नागपूर सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त कर्मचाऱ्यांना ५ वा ६ वा वेतन आयोग देण्याबाबत**

**(४३) ५८०३९ (२२-०८-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ कर्मचारी संघर्ष संघटना नागपूर सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त कर्मचाऱ्यांना ५ वा ६ वा वेतन आयोग लाभ देण्याबाबतचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांना सहकार मंत्री यांना दिनांक ४ मे, २०१६ रोजी दिले हे खरे आहे का,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या अधिनस्त असलेल्या ६१ महामंडळापैकी महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ "ना नफा ना तोटा" या तत्वावर आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने ५ वा ६ वा वेतन आयोगाचा दिनांक १ जानेवारी, १९९६ व दिनांक १ जानेवारी, २००६ पासून दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळातील स्वेच्छानिवृत्त घेतलेल्या आणि नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या एकुण ३७१ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्यात लाभ देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. सुभाष देशमुख (१८-१०-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही, राज्य शासनाने हातमाग महामंडळातील कार्यरत कर्मचाऱ्यांना दिनांक १.४.२००८ पासून ५ वा व दिनांक २६.११.२०१४ पासून ६ वा वेतन आयोग लागू केला आहे.

(४) व (५) शासनाने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळातील कार्यरत कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग दिनांक १.४.२००८ पासून लागू केला आहे. त्यावेळी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतल्यामुळे / नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे एकूण ३७१ कर्मचारी महामंडळाच्या आस्थापनेवर कार्यरत नसल्याने त्यांना लाभ देण्यात

आलेला नाही. या संदर्भात सदर कर्मचाऱ्यांनी मा.औद्योगिक न्यायालयाकडे दाखल केलेली याचिका मा.औद्योगिक न्यायालयाने खारीज केली असून त्यावरील अपिल मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर व मा.सर्वोच्च न्यायालय यांनी फेटाळले आहे.
(६) विलंब झालेला नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील यंत्रमाग कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर**

**(४४) ५८३८७ (२२-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील यंत्रमाग कारखाने शासनाचे दुर्लक्ष आणि वाढलेला उत्पादन खर्च यामुळे माहे जून, २०१६ पासून बंद पडण्याच्या मार्गावर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात इचलकरंजी पॉवरलूम विव्हर्स असोसिएशने मा. मुख्यमंत्री यांना एक लेखी निवेदन दिले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१०-२०१६) :** (१) यंत्रमाग कारखाने शासनाचे दुर्लक्षमुळे बंद पडले नसून, ते स्थानिक तथा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कापड खरेदीची मागणी मंदावली आहे, कापड विक्रि होत नसल्याने, यंत्रमागधारकांना व्यापा-यांकडून सुतपुरवठा व कच्चा मालाचा पुरवठा होत नाही. त्यामुळे कापड उद्योगातील व्यवहारात आर्थिक मंदी वाढल्याने कोल्हापूर जिल्हयातील यंत्रमाग व्यवसायावर मंदीचे सावट आहे.
(२) होय.
(३) इचलकरंजी पॉवरलूम विव्हर्स असोसिएशनच्या निवेदनाच्या अनुषंगाने मुद्देनिहाय अभिप्राय संचालक (वस्त्रोद्योग) यांचेकडून मागविण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळाचे संकट दूर करण्यासाठी जागतिक बँकेने दिलेल्या कर्जाबाबत**

**(४५) ५९८०० (२२-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील ६ हजार गावावर ओढविलेल्या दुष्काळाचे संकट दूर करण्यासाठी जागतिक बँकेकडून सहा महिन्यात (अंदाजे ऑक्टोंबर, २०१६ पर्यंत) पाच

हजार कोटी रुपयांचे कर्ज राज्य शासनाला मिळणार असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी दिल्ली येथे दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्जाच्या रकमेत कोणकोणत्या योजना हाती घेण्यात येणार आहेत,

(३) सदर कर्जाच्या अटी व शर्ती काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (१७-१०-२०१६)** :(१), (२) व (३) मराठवाडा व विदर्भातील दुष्काळग्रस्त गावांसाठी तसेच पूर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाण पट्टयातील जमिनीचा पोत सुधारुन सुमारे ४९०० गावांचा विकास करण्याची बाब अंतर्भुत असलेला हवामान अनुकूल कृषी प्रकल्पाचा (POCRA) प्रस्ताव राज्य शासनाने जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यासाठी केंद्र शासनास सादर केला होता.

केंद्र शासनाने सदर प्रकल्प प्रस्तावाची जागतिक बँकेकडे शिफारस केली होती व त्यानुसार जागतिक बँकेने राज्य शासनासोबत सदर नियोजित प्रकल्पाची आखणी व अंमलबजावणी करण्यास सहमती दर्शविलेली आहे. त्यानुषंगाने दि.७ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाने सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीस तत्वत: मान्यता दिली व दि.१०.८.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुंबई येथे प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करणे तसेच प्रकल्पास आवश्यक पदांच्या निर्मितीस मंजूरी प्रदान केली आहे.

सदर नियोजित प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु असून, सदर आराखडा अंतिमत: केंद्र शासन व जागतिक बँकेने मंजूर करतेवेळी प्रस्तावित प्रकल्पांतर्गत विविध कामांकरिता उपलब्ध होणाऱ्या निधीचा तसेच जागतिक बँकेच्या कर्जाच्या अटी व शर्ती तपशील निश्चित होणार आहे.

---

## राज्यातील पॉवरलुम उद्योगाची परिस्थिती अत्यंत बिकट असल्याबाबत

**(४६) ६११११९ (२२-०८-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अस्तित्वात असलेले पॉवरलुम उद्योगाची परिस्थिती अत्यंत बिकट असून राज्यात पॉवरलुमधारकांना आवश्यक त्या प्रमाणात सुत गिरण्या राज्यात नसल्याने पॉवरलुमधारकांना दक्षिणेतील राज्यातून सुत आयात करावे लागत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव आयात सुतावर विक्रीकर व इतर कर आणि माल वाहतुकदार या होणाऱ्या खर्चामुळे राज्यात तयार होणारे सुत कपडयांची किंमत इतर राज्यापेक्षा जास्त असल्याने खुले बाजारात राज्यातील पॉवरलुमधारकांना नुकसान सोसावे लागत आहे, हे लक्षात घेता शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-१०-२०१६) :** (१) होय, सदर विनेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(२) सदर बाब वस्त्रोदयोग विभागाच्या अखत्यारीतीत येत नाही. परंतु वित्त विभाग व परिवहन विभाग यांना याबाबत कार्यवाही करून तसा अहवाल विभागास पाठविण्यात यावा असे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या समाजकल्याण विभागाकडून चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळेत अतिरीक्त ठरलेल्या शिक्षकांचे वेतन बंद केल्याबाबत**

**(४७) ६१३१० (२०-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या समाजकल्याण विभागाकडून चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळेत अतिरीक्त ठरलेल्या शिक्षकांना वेतन देण्यात येत होते. मात्र येथून पुढे वेतन बंद केल्याने याचा फटका सोलापूर जिल्हयातील शिक्षकांना बसणार आहे. सोलापूर जिल्हयात अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे ३०० च्या आसपास असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना इतर आश्रमशाळांत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (१३-१०-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हयात सद्य:स्थितीत २२० कर्मचारी अतिरिक्त आहेत.

(२) विजाभज आश्रमशाळेत जस-जसे पदे रिक्त होतील तसतसे रिक्त पदावर अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचे निर्देश शासन निर्णय दि.१६.१०.२०१२ अन्वये दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यंत्रमाग महामंडळास असलेले आरक्षण रद्द करण्यात आलेबाबत**

**(४८) ६१३९२ (२२-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यंत्रमाग महामंडळास असलेले आरक्षण शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ द्वारे रद्द करण्यात आलेले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खरेदीधोरण कार्यपध्दतीतून अनेक जाचक अटी लादल्यामुळे सदर महामंडळ खरेदी प्रक्रियेत भाग घेऊ शकत नाही. व त्यामुळे महामंडळ व महामंडळाकडील कर्मचारी काम नसल्यामुळे आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाची गणवेश कापडाचे आरक्षण कायम ठेऊन गणवेश कापडाची दरनिश्चीती करणेची मागणी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ कर्मचारी संघटना मुंबई यांनी मा. मुख्यमंत्री व वस्त्रोद्योग मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (१४-१०-२०१६) :**(१) हे पूर्णत: खरे नाही.

यापूर्वीचे शासनाचे खरेदी धोरण दिनांक २/१/१९९२ मध्ये शासकीय महामंडळे/उपक्रम यांना खरेदीमध्ये आरक्षण ठेवण्यात आले होते. त्यामध्ये सुधारणा करुन दिनांक ३०/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, शासकीय महामंडळे/उपक्रम यांना निविदेत भाग घेण्याचा व निविदेत भाग घेतल्यास एकूण खरेदीच्या ३० टक्के खरेदी एल-१ दराने राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांचा देखील समावेश आहे.
(२) सुधारीत खरेदी धोरणानुसार यंत्रमाग महामंडळास निविदेत भाग घेण्याची अट देण्यात आली आहे. तथापि काही खरेदीदार विभागांनी त्यांच्या निविदेमध्ये विशिष्ट कंपनीचे कापड मागविल्याची अट तसेच इतर अटी नमुद केल्या असल्याची बाब अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांनी दिनांक २७/७/२०१६ रोजीच्या निवेदनाद्वारे उद्योग विभागाच्या निदर्शनास आणून दिली आहे. तसेच सदरची अट वगळण्याची मागणी केली आहे. त्याबाबत शासन स्तरावर छाननी करण्यात येत आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाचे गणवेश कापडाचे आरक्षण कायम ठेऊन गणवेश कापडाची दरनिश्चीती करणेची मागणी शासनाकडे केली आहे. सदर मागणी विचारात घेऊन प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर विचारार्थ सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## रतन इंडीया औष्णीक विद्युत प्रकल्प नांदगांव पेठ जि.अमरावती येथे ८०% स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यामध्ये प्राधान्याने घेण्याबाबत

**(४९) ६२४८४ (२२-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रतन इंडीया औष्णीक विद्यृत प्रकल्प नांदगांव पेठ जि.अमरावती येथे ८०% स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यामध्ये समाविष्ट केले नसल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील उमेदवारांना योग्य प्रमाणात नोकऱ्यांमध्ये समाविष्ठ न केल्यामुळे जनमानसात रोष निर्माण झाला असून त्यांना नोकरीत समाविष्ठ करण्याबाबत स्थानिक प्रशासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (०३-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.
सदर प्रकल्पामध्ये एकूण १७४ प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या उपलब्ध केल्या असून शासनाच्या दि.१७/११/२००८ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी केली जात असल्याचे उद्योग संचालनालयाने कळविले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील ता.चामोर्शी कृ.उ.बा.समितीचे सभापती श्री अतुल गण्यारपवार यांचेवर लाच प्रकणात चौकशी करून कार्यवाही करणेबाबत**

**(५०) ६२८०० (२२-०८-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी कृ.उ.बा.समितीचे सभापती श्री अतुल गण्यारपवार यांना दि.२३/०४/२०१४ रोजी वा त्या सुमारास कंत्राटदार सुभाष कसनगोटावार यांचे कडून ठरलेल्या १३ लाख रु.पैकी नगद ५ लक्ष रु ची लाच घेताना लाचलुचपत विभागाकडून पकडण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरीत ८ लाख रु. ची लाच अतुल गण्यारपवार यांनी धनादेशाद्वारे स्वीकारली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणात त्यांना लाचलुचपत विभागामार्फत पोलिस कोठडी झालेली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लाच लुचपत प्रतिबंध अधिनियामाबाबतचे परिपत्रकानुसार या दोषी सभापतीची सखोल चौकशी करून त्याचेवर कार्यालयीन कार्यवाहीचे आदेश मा. पणन संचालक पुणे यांना देवून सुद्धा त्याचेवर अजूनपर्यंत कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०९-२०१६) :** (१), (२) व (३) होय.
(४) व (५) श्री.गण्यारपवार यांना लाचलुचपत अधिनियमाखाली अटक झाल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा उपनिबंधकांच्या दि. ११.११.२०१४ च्या आदेशान्वये श्री.गण्यारपवारांसह या बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. श्री.गण्यारपवार यांचे प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे. पणन अधिनियमातील

तरतुदीप्रमाणे दोषी व्यक्तीस न्यायालयाने सहा महिन्यापेक्षा अधिक काळासाठी शिक्षा दिली असल्यास अशा व्यक्ती निवडणूक लढण्यास अपात्र ठरतात. परंतु श्री.गण्यारपवार यांचेविरुध्दचे अद्याप दोष सिध्द न झाल्यामुळे दरम्यानच्या काळात बाजार समितीची निवडणूक होऊन श्री.अतुल गण्यारपवार पुन्हा सभापतीपदी निवडून आले आहेत.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.